नि.फौ.ख.क्र.९८/२०२३
शासन विरुध्द सचिन यादव
नि.क्र.२२ पुढे सुरु.

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची उलटतपासणी शपथेवर सुरु**

**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.डी.पी.धुमाळ**

**४.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासुला चष्मा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या चष्म्याशिवाय जवळचे व लांबचे दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचा माझ्या सासुशी कोणताही वाद नाही. हे म्हणणे खरे आहे की, विहिरीच्या

पाणी वापरात माझ्या चारही सास-यांचा हक्क आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या पाणी वापराबाबत कुणी कोणता वार वापरावा अशी वाटणी झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सचिन हा परस्पर इतरांना त्या विहिरीचे पाणी देतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझ्या सासु सास-यांना त्याचा राग येत होता. त्यांनी त्यास दोनदा समजवून देखील सांगीतले परंतु त्याने ऐकले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्याच्या विरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. दि. ०७.०१.२०२३ रोजी मी स्वतः पोलीस ठाण्यात तक्रार देण्याकरीता गेले होते. त्यावेळी माझ्यासह माझी सासू सासरे देखील होते. आमच्यासह गाडीचा ड्रायव्हर बाळु देखील त्यावेळी होता. मी सुध्दा पोलीसांना कथीत घटनेची तक्रार सांगीतली होती. मी दुस-या दिवशी पुन्हा पोलीस ठाण्यात गेले होते. तेव्हा देखील माझे सासू सासरे माझ्या सोबत होते. पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे तक्रार नोंदवून घेतली होती. त्या तक्रारीवर माझ्या सासूची सही घेण्यात आली होती. साक्षीदार स्वतःहून सांगते की, ती तक्रार माझ्या सासूनेच दिली होती व मी त्यावेळी तिच्यासह होते.  त्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेले नव्हते. पोलीस मात्र त्यानंतर घटनास्थळी आले होते. मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले होते. मी पोलीसांना लाकुड दाखविले होते.

**उर्वरीत उलटतपास पुढील तारखेकरीता तहकूब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

*स्वाक्षरी/-*

दि.२५.०७.२०२४

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.२,वाई.